# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.
## नगरसचिव कार्यालय

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकाराचा वापर करुन मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक २९/०३/२०२३ चे ठराव**

---

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-२९९** **विषय क्रमांक – २९९**

**दिनांक- २९/०३/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र.२९९ दिनांक - २९/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.सविवि/०४/कावि/१७८/२०२३ दि.२०/०३/२०२ आणि मा.स्थायी समिती ठराव क्र.१३८८ दिनांक २१/०३/२०२३ अन्वये, "दिव्यांग व्यक्तींना पी. एम. पी. एम. एल. चे मोफत बसपास देणे" व "महानगरपालिका हद्दीतील ६० वर्षापुढील अंध व्यक्तीच्या सोबतीस असणा-या व्यक्तीस बस प्रवासाचा मोफत पास" या दोन योजनांचे फॉर्म ऑनलाईन पद्धतीने करुन योजनेच्या अटी व शर्ती मध्ये दुरुस्ती करणेबाबत. |
| **ठराव क्र.२९९ दिनांक - २९/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.सविवि/०४/कावि/१७८/२०२३ दि.२०/०३/२०२३ आणि मा.स्थायी समिती ठराव क्र.१३८८ दिनांक २१/०३/२०२३ अन्वये, पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागामार्फत दिव्यांग कल्याणकारी योजने अंतर्गत, मा.महापालिका सभा ठराव क्र.४९, दिनांक १०/०५/२०२२ व मा.आयुक्त सो., यांचेकडील आदेश क्र.सविवि/०२/ कावि/८७/२०२२, दिनांक ३०/०५/२०२२ अन्वये १) "दिव्यांग व्यक्तींना पी. एम. पी. एम. एल. चे मोफत बसपास देणे" व २) "महानगरपालिका हद्दीतील ६० वर्षापुढील अंध व्यक्तीच्या सोबतीस असणा-या व्यक्तीस बस प्रवासाचा मोफत पास" या दोन योजना कार्यान्वित आहे. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षापासून समाज विकास विभागातील, सर्व योजनांचे फॉर्म ऑनलाईन पध्दतीने स्विकारले जात आहेत. याप्रमाणेच PMPML बसपासचे फॉर्म ऑनलाईन पध्दतीने स्विकारणे व योजनेच्या अटी व शर्ती मध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे. १) "दिव्यांग व्यक्तींना पी. एम. पी. एम. एल. चे मोफत बसपास देणे" या योजनेसाठी प्रपत्र "अ" प्रमाणे अटी व शर्ती सादर केलेल्या आहेत. व २) "महानगरपालिका हद्दीतील ६० वर्षापुढील अंध व्यक्तीच्या सोबतीस असणा-या व्यक्तीस बस प्रवासाचा मोफत पास" या योजनेसाठी प्रपत्र "ब" प्रमाणे अटी व शर्ती सादर केलेल्या आहेत. तरी, सदर योजनेच्या दुरुस्तीस व नवीन अटी/शर्तींना मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-३००** **विषय क्रमांक – ३००**

**दिनांक- २९/०३/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३०० दिनांक - २९/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.सविवि/४अ/कावि/१५४/२०२३ दि.२०/०३/२०२३ आणि मा.स्थायी समिती ठराव क्र.१३८९ दिनांक २१/०३/२०२३ अन्वये, निरामय आरोग्य विमा योजना :- पिंपरी चिंचवड शहरातील मतिमंद, आत्ममग्न, मेंदुचा पक्षाघात झालेला व्यक्ती व बहुविकलांग व्यक्ती या लाभार्थ्यांना निरामय आरोग्य विमा योजना राबविणेबाबत. |
| **ठराव क्र.३०० दिनांक - २९/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.सविवि/४अ/कावि/१५४/२०२३ दि.२०/०३/२०२३ आणि मा.स्थायी समिती ठराव क्र.१३८९ दिनांक २१/०३/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड शहरातील मतिमंद, आत्ममग्न, मेंदुचा पक्षाघात झालेला व्यक्ती व बहुविकलांग व्यक्ती या लाभार्थ्यांना "निरामय आरोग्य विमा" योजना राबविणेबाबत समाज विकास विभागामार्फत दि.२४/११/२०२२ रोजी कार्यालयीन प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. सदर प्रस्तावास मा.आयुक्त सो. यांनी दि.०९/०३/२०२३ रोजीच्या बैठकीमध्ये मान्यता दिलेली आहे. दिव्यांगांचे एकूण २१ प्रकार असून, निरामय आरोग्य विमा योजना राष्ट्रीय न्यास संस्थेच्या अंतर्गत १.Mental illness – मानसिक आजार २.Cerebral Palsy – मेंदुचा पक्षाघात ३.Autism Spectrum Disorder – स्वमग्न ४.Multiple Disabilities including deaf blindness – बहुविकलांग असलेल्या व्यक्तींना परवडणारा आरोग्य विमा प्रदान करण्याकरिता चालविला जातो. नॅशनल ट्रस्ट ही भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालयाची एक वैधानिक संस्था आहे. ज्याची स्थापना "ऑटिझम, सेरेब्रल पाल्सी, मतिमंदला आणि एकाधिक दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तींच्या कल्याणासाठी राष्ट्रीय न्यास" कायदा (१९९९ चा कायदा ४४) अंतर्गत करण्यात आली आहे. निरामय आरोग्य विमा योजना मध्ये नोंदणी करणेसाठी नॅशनल ट्रस्ट ची मान्यता प्राप्त अधिकृत संस्था होणे आवश्यक आहे. महात्मा गांधी सेवा संघ ही अखिल भारतीय स्तरावरील मान्यता प्राप्त नोंदणीकृत व अधिकृत संस्था आहे. समाज विकास विभागामार्फत मतिमंदाकरीता "मनपा हद्दीतील विशेष मतिमंद मुले/व्यक्तींचा सांभाळ करणा-या मनपा हद्दीतील नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थेस अथवा मतिमंद व्यक्तींच्या पालकास अर्थसहाय्य" अशी योजना राबविलेली जाते. सदर योजनेअंतर्गत सद्यस्थितीत एकूण २३०० लाभार्थी आहेत. "निरामय आरोग्य विमायोजना" या योजनेअंतर्गत प्रति वर्षी प्रती लाभार्थी र.रु.५५०/- याप्रमाणे निरामय आरोग्य विमा योजना अंतर्गत प्रिमियम चे पैसे महात्मा गांधी सेवा संघ या नॅशनल ट्रस्टच्या अधिकृत संस्थेला हस्तांतरित करावे लागेल. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरीता विशेष (मतिमंद) एकूण लाभार्थी २३०० x ५५० = र.रु.१२,६५,०००/- इतका खर्च येणार आहे. सदर योजनेकामी दरवर्षी र.रु.१५,००,०००/- इतकी अंदाजे तरतूद करणे आवश्यक आहे. याशिवाय "निरामय आरोग्य विमायोजना" अंतर्गत प्रत्येक लाभार्थ्यांचे दरवर्षी नुतनीकरण करणेसाठी अंदाजे र.रु.१५,००,०००/- व त्यापेक्षा अधिक खर्च येणार आहे. "निरामय आरोग्य विमा योजना" या योजनेसाठी येणा-या खर्चाकरीता दिव्यांग कल्याणकारी योजनेमध्ये नवीन उपलेखाशिर्ष तयार करणे आवश्यक आहे. तसेच योजनेच्या अनुषंगाने सोबत प्रपत्र "अ" प्रमाणे अटी व शर्ती सादर केलेल्या आहेत.<br><br>दिव्यांग कल्याणकारी योजनेअंतर्गत नव्याने निर्माण करण्यात येणा-या "निरामय आरोग्य विमा योजना" पिंपरी चिंचवड शहरातील मतिमंद, आत्ममग्न, मेंदुचा पक्षाघात झालेला व्यक्ती व बहुविकलांग व्यक्ती या लाभार्थ्यांना निरामय आरोग्य विमा योजना राबविणे या योजनेकरीता उपलेखाशिर्ष तयार करणेस तसेच योजनेच्या नवीन अटी/शर्तींना मान्यता मिळणेकामी |

| | |
|---|---|
| | मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-३०१** **विषय क्रमांक – ३०१**

**दिनांक- २९/०३/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३०१ दिनांक - २९/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.डक्षेका/जनि/कावि/१९१/२०२३ दि.२०/०३/२०२३ आणि मा.स्थायी समिती ठराव क्र.१४०५ दिनांक २१/०३/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे “ड” प्रभागातील जलनिःसारण नलिकांची वार्षिक ठेकेदारी पद्धतीने साफसफाई करणे व चोकअप काढणे. या कामास मुदतवाढ (प्रथम वर्ष २०२३-२०२४ पर्यंत) देणेबाबत. |
| **ठराव क्र.३०१ दिनांक - २९/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.डक्षेका/जनि/कावि/१९१/२०२३ दि.२०/०३/२०२३ आणि मा.स्थायी समिती ठराव क्र.१४०५ दिनांक २१/०३/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे “ड” प्रभागातील जलनिःसारण नलिकांची वार्षिक ठेकेदारी पद्धतीने साफसफाई करणे व चोकअप काढणे.या कामास मुदतवाढ (प्रथम वर्ष २०२३-२०२४ पर्यंत) देणेकामी मे.मनिष असोसिएट्स यांना मा.स्थायी समिती ठराव क्र.१११९५ दिनांक १९/०१/२०२२ नुसार करारनामा शर्तीनुसार दि.१५/०२/२०२२ च्या आदेशान्वये कामाचे आदेश देणेत आलेले होते. सदर कामाची मुदत दिनांक १४/०२/२०२३ पर्यंत आहे. निविदा अटी व शर्तीनुसार सदर निविदेतील दर हे निविदा कालावधी पर्यंत कायम राहतील. सदर निविदेचा कार्य कालावधी ०५ (पाच) वर्षे आहे. तथापि कामाचा आदेश व करारनामा हा ०१ (प्रथम) वर्षासाठी देणेत आलेला आहे. त्यानंतर कामाची प्रगती, Performance विचारात घेऊन पुढील प्रत्येक वर्षासाठी मा. स्थायी समितीच्या मान्यतेने मुदतवाढ देणेत येईल. तसेच निविदा अटी व शर्तीनुसार एक वर्षानंतर भाववाढ फरक देय नाही. त्यानुसार ठेकेदाराने सदरचे काम एक वर्षात समाधानकारक पूर्ण केलेले आहे. प्रथम मुदतवाढीसाठी (१४.०२.२०२४ पर्यत) मा.स्थायी समितीची मंजुरी प्राप्त करणे आवश्यक आहे. सदर कामासाठी सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकात र.रू.१,००,००,०००/- तरतुद करण्यात आलेली आहे. निविदा अटी व शर्तीनुसार मा.स्थायी समितीने ठरावात नमूद केलेला १ वर्षे कालावधीची मुदत दिनांक १४/०२/२०२३ रोजी पुर्ण होत आहे. वर नमूद केलेनुसार मे.मनिष असोसिएट्स यांस पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील मलनिःसारण नलिका मॅनहोल चेंबर्सची सफाई आधुनिक यांत्रिकी पद्धतीने करणे. (सक्शन, जेटींग सह हायड्रोलिक ग्रॅब मशिनच्या सहाय्याने) या कामास दिनांक १५/०२/२०२३ पासून ते दिनांक १४/०२/२०२४ पर्यंत प्रथम मुदतवाढीसाठी व र.रू.१,०५,३६,२५०/- च्या खर्चास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-३०२** **विषय क्रमांक – ३०२**

**दिनांक- २९/०३/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३०२ दिनांक - २९/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.बक्षेका/पापु/२/कावि/१५/२०२३ दि.२१/०३/२०२३ आणि मा.स्थायी समिती ठराव क्र.१४२५ दिनांक २१/०३/२०२३ अन्वये, मनपाचे ब, ग, ड व ह प्रभागातील पाण्याच्या टाकीचे परिचालन करणे व देखभाल दुरुस्तीची कामे करणे, या कामांसाठी वाढीव प्रशासकीय मान्यता व मुदतवाढ मिळणेबाबत. |
| **ठराव क्र.३०२ दिनांक - २९/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.बक्षेका/पापु/२/कावि/१५/२०२३ दि.२१/०३/२०२३ आणि मा.स्थायी समिती ठराव क्र.१४२५ दिनांक २१/०३/२०२३ अन्वये, पाणीपुरवठा ग्रॅव्हिटी विभागाअंतर्गत “सन २०२०-२१ करिता परिचालन करणे व देखभाल दुरुस्ती करणे” या कामांना दि.३१/०७/२०२२ पर्यंत प्रथम व दि.३१/१०/२०२२ पर्यंत द्वितीय मुदतवाढ घेणेत आलेली आहे. तथापि प्रथम मुदतवाढीचा कालावधी पुर्ण होणे अगोदर म्हणजे दि.०५/०६/२०२२ रोजी नविन कामांसाठी निविदा क्र.पापु/मुख्य/३/४७/२०२२-२०२३ नुसार प्रसिध्द करणेत आलेली आहे. त्या अनुषगांने संबंधित निविदा कारांनी उपस्थित केलेले मुद्दे/ आक्षेपांबाबत मा.अतिरिक्त आयुक्त १ यांच्या दालनामध्ये दि.०८/१२/२०२२ रोजी सुनावणी घेण्यात आली. या सुनावणी मध्ये मा. अतिरिक्त आयुक्त १ यांनी दिलेल्या सुचनेनुसार इतर विभागाची माहिती गोळा करणे व आक्षेपांचे निरसन करण्यास विलंब झाला. त्यामुळे सन २०२२-२३ चे परिचालन करणेसाठी मजुर पुरविणे या कामांचे आदेश देणेस विलंब झाला आहे. तसेच सद्यस्थितीत खाली नमुद केलेल्या कामांची दुसरी मुदतवाढ संपुष्ठात आलेले आहे. |

| अ क्र | कामाचे नाव | कामाची प्रशासकीय मान्यता | आवश्यक सुधारित प्रशासकीय मान्यता | मुळ निविदा रक्कम | आवश्यक सुधारित निविदा रक्कम | कामाचा कालावधी | सुधारित एकुण कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | स. नं. ९ नायडू पाण्याच्या टाकीवरील व त्यावरील बायपास या जलक्षेत्रामध्ये दैनंदिन परिचालन करणे व पाणीपुरवठा देखभाल व दुरुस्तीची कामे करणे. | ११०००००० | १३०००००० | ११०००००० | १२६००००० | मुळ मुदत – १२ महिने<br>प्रथम मुदतवाढ - दि. ३१/०७/२०२२ पर्यंत(६ महिने)<br>दुसरी मुदतवाढ - दि. ३१/१०/२०२२ पर्यंत(३महिने) | २६ महिने |
| | **आदेश क्र. :-** पापु/६/कावि/२५/२०२१ दि. १८/०१/२०२१ | | | | | तिसरी मुदतवाढ - दि. ३१/०३/२०२३ पर्यंत (५ महिने) प्रस्तावित | |
| २) | सन २०२०-२१ साठी बिजलीनगर व प्रेमलोक पार्क पाण्याच्या टाक्यांवरील जलक्षेत्रामध्ये दैनंदिन परिचालन करणे व देखभाल दुरुस्ती करणे. | १५४००००० | २१०००००० | १७२५५७३८ | २०५७५००० | मुळ मुदत – १२ महिने<br>प्रथम मुदतवाढ - दि. ३१/०७/२०२२ पर्यंत(६ महिने)<br>दुसरी मुदतवाढ - दि. ३१/१०/२०२२ पर्यंत(३ महिने) | २६ महिने |
| | **आदेश क्र. :-** पापु/६/कावि/३१/२०२१ दि. १८/०१/२०२१ | | | | | तिसरी मुदतवाढ - दि. ३१/०३/२०२३ पर्यंत (५ महिने) प्रस्तावित | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ३) | सन २०२०-२१ साठी से. क्र. २९ रावेत येथील जलक्षेत्राचे दैनंदिन परिचालन करणे व पाणीपुरवठा विषयक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | १२३००००० | २५०००००० | ११३७३०८१ | २३८८७००० | मुळ मुदत – १२ महिने<br>प्रथम मुदतवाढ - दि. ३१/०७/२०२२ पर्यंत(६ महिने)<br>दुसरी मुदतवाढ - दि. ३१/१०/२०२२ पर्यंत(३ महिने) | २६ महिने |
| | | **आदेश क्र. :-** पापु/६/कावि/२७/२०२१ दि. १८/०१/२०२१ | | | | | तिसरी मुदतवाढ - दि. ३१/०३/२०२३ पर्यंत(५ महिने) प्रस्तावित | |
| | ४) | सन २०२०-२१ साठी किवळे, मामुर्डी व रावेत स. नं. ९६ येथील जलक्षेत्रामध्ये पाणीपुरवठा होणा-या वितरण व्यवस्थेचे परिचालन करणे व देखभाल दुरुस्ती करणे. | १५८००००० | २३०००००० | १३१५२३७८ | २१८९६००० | मुळ मुदत – १२ महिने<br>प्रथम मुदतवाढ - दि. ३१/०७/२०२२ पर्यंत(६ महिने)<br>दुसरी मुदतवाढ - दि. ३१/१०/२०२२ पर्यंत(३ महिने) | २६ महिने |
| | | **आदेश क्र. :-** पापु/६/कावि/२९/२०२१ दि. १८/०१/२०२१ | | | | | तिसरी मुदतवाढ - दि. ३१/०३/२०२३ पर्यंत (५ महिने) प्रस्तावित | |
| | ५) | थेरगाव टाकी जलक्षेत्रांमधील पाणीपुरवठा विषयक परिचालन करणे व पाणीपुरवठा विषयक देखभाल दुरुस्तीची कामे करणे | १२५००००० | १७५००००० | १२५००००० | १६५००००० | मुळ मुदत – १२ महिने<br>प्रथम मुदतवाढ - दि. ३१/०७/२०२२ पर्यंत(६ महिने)<br>दुसरी मुदतवाढ - दि. ३१/१०/२०२२ पर्यंत(३ महिने) | २६ महिने |
| | | **आदेश क्र. :-** पापु/६/कावि/१९/२०२१ दि. १८/०१/२०२१ | | | | | तिसरी मुदतवाढ - दि. ३१/०३/२०२३ पर्यंत(५ महिने) प्रस्तावित | |
| | ६) | सन २०२०-२१ करिता पिंपळे सौदागर व वैदु वस्ती जलक्षेत्रातील वितरण व्यवस्थेचे परिचालन करणे व पाणीपुरवठा विषयक देखभाल दुरुस्तीची कामे करणे | १५०००००० | १९५००००० | १३९२४००० | १७५००००० | मुळ मुदत – १२ महिने<br>प्रथम मुदतवाढ - दि. ३१/०७/२०२२ पर्यंत(६ महिने) | २६ महिने |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **आदेश क्र. :-**<br>पापु/६/कावि/४६/२०<br>२१<br>दि. ०१/०२/२०२१ | | | | | दुसरी मुदतवाढ - दि. ३१/१०/२०२२ पर्यंत(३ महिने)<br>तिसरी मुदतवाढ - दि. ३१/०३/२०२३ पर्यंत (५ महिने) प्रस्तावित | |

तसेच मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.स्था/श.अ/तां/४/०३/२०२३ दि.१०/०१/२०२३ रोजीचे आदेशान्वये तसेच सद्यस्थितीत चिंचवड विधानसभेच्या पोटनिवडणुकीमुळे आचार सहिंता सुरु असुन निविदा प्रक्रिय पुर्ण करणे शक्य होणार नाही. त्यामुळे उपरोक्त नमुद कामांना दि.३१/०३/२०२३ पर्यंत मुदतवाढ देणे व त्या अनुषंगाने वाढीव खर्चास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| | |
|---|---|
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-३०३** **विषय क्रमांक – ३०३**

**दिनांक- २९/०३/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३०३ दिनांक - २९/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.पापु/मुख्य/तां.३६/२०२३ दि.२१/०३/२०२३ आणि मा.स्थायी समिती ठराव क्र.१४३४ दिनांक २१/०३/२०२३ अन्वये, पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेत अनअधिकृत नळजोड अधिकृत करणेसाठीचे धोरण ठरविणेबाबत. |
| **ठराव क्र.३०३ दिनांक - २९/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.पापु/मुख्य/तां.३६/२०२३ दि.२१/०३/२०२३ आणि मा.स्थायी समिती ठराव क्र.१४३४ दिनांक २१/०३/२०२३ अन्वये, शहरातील विविध भागातील पाण्याबाबतच्या तक्रारी विचारात घेऊन अनधिकृत नळजोड नियमित करण्यासाठी विशेष मोहिम हाती घेण्याचे तसेच सदर मुदतीत जर नागरिकांनी नळजोड नियमित करण्यासाठी अर्ज सादर नाही केले तर त्याविरुध्द कडक कारवाई करण्याचे आदेश मा.आयुक्त यांनी दि.०७/०५/२०२२ रोजी झालेल्या बैठकीत पाणीपुरवठा विभागाच्या अधिका-यांना दिले. त्यानुसार नळजोड देण्याचे धोरणामध्ये पूर्वी असलेली दि.३०/०६/२०१८ पासूनची पाणीपट्टी आकारण्यात येत होती परंतु ही बाब शिथिल करुन सदर पाणीपट्टी माफ करणेत आली होती व ग्राहकांकडून रहिवासीचा पुरावा म्हणून कोणतेही एक कागदपत्र (आधार कार्ड, मतदान ओळखपत्र, ड्रायव्हींग लायसन्स, पॅन कार्ड, मनपाची मिळकत बिल, लाईट बिल, झोपडपट्टी पास) ग्राह्य धरुन अनधिकृत नळ कनकेशन अधिकृत करणेसाठी (२००/- रुपये डिपॉझिट व ३०००/- रुपये पाणीपट्टी) घेऊन कार्यवाही करणेसाठी दि.०१/०६/२०२२ ते दि.३१/१२/२०२२ पर्यंत अभय योजना राबविणेत आली होती. तरी सदरबाबत ग्राहकांकडून अपेक्षित प्रतिसाद प्राप्त झालेला नाही. फक्त २६८४ नळ कनेक्शन अधिकृत करण्यात आले. उपरोक्त विषयास अनुसरुन मा.आयुक्त सो. यांचे दालनामध्ये दि.०३/०२/२०२३ रोजी सकाळी १०.०० वा.बैठक आयोजित करणेत आली होती. सदर बैठकीमध्ये अनाधिकृत नळजोडचा मुद्दा उपस्थित आला होता. यावर मा.आयुक्त सो. यांनी अनाधिकृत नळजोड अधिकृत करणेकरीता धोरण ठरविणेबाबत निर्देश दिले आहेत. तरी वरील बाबी लक्षात घेता, पाणीपुरवठा वितरण |

| | |
|---|---|
| | व्यवस्थेत अनाधिकृत नळजोड अधिकृत करणेसाठीचे खालील प्रमाणे धोरण ठरविणे आवश्यक आहे. शासन निर्णय क्र.अमृत-२०२२/प्र.क्र.१४१/नवि-३३, दि.१४ जुलै २०२२ रोजीच्या अनुषंगाने शासनाच्या अमृत-२.० योजनेंतर्गत १ नोव्हेंबर २०२१ नंतरच्या प्रत्येक नवीन नळजोडकरीता र.रु.३०००/- प्रति नळजोड प्रोत्साहनार्थ रक्कम शासनाकडून महानगरपालिकेस प्राप्त होणार आहे. सदर नळजोडणी करणेस एकूण र.रु. १० हजार इतका खर्च अपेक्षित आहे.अशा प्रकारे एकूण अंदाजे ३०,००० अनधिकृत नळजोड कनेक्शनसाठी १०,००० X३०,००० = र.रु. ३० कोटी खर्च येणार आहे शिवाय शासनाकडून प्रत्येक नवीन नळजोड कनेक्शनमागे ३००० रुपये मिळणार आहे. अंदाजे ३००० X३०,००० असे एकूण रु. ९ कोटी मनपास मिळणार आहे. एकंदरीत मनपास ३० – ९ = र.रु. २१ कोटी असा मूळ खर्च अपेक्षित आहे. अनधिकृत अंदाजे ३० हजार नळजोड अधिकृत केल्यास १५० द.ल.लि. हिशोबबाह्य पाणीपट्टी मनपास मिळणे अपेक्षित आहे त्यामुळे ३० कोटी वार्षिक पाणीपट्टी मनपास प्राप्त होऊ शकते. मनपामार्फत दरवर्षी पाणीपट्टीतील वाढ व वसुली हि कायमस्वरुपी असणार आहे व महापालिकेचे अधिकृत नळजोड संख्येमध्ये वाढ होऊन पाणीपट्टीमध्ये सुध्दा वाढ होणार आहे. सदरचे धोरण राबविणे हे जुन्या अनाधिकृत नळजोड मधून होणारी पाणी गळती कमी करण्यास व पाण्याची बचत करण्यास उपयोगी ठरणार आहे ज्यामुळे शहराची वाढती लोकसंख्या यास ह्याचा फायदा होईल. सोबतच हिशोबबाह्य पाणी (NRW) कमी झाल्याने मनपाच्या फायद्याचे ठरणार आहे.अनाधिकृत नळजोड अधिकृत करणेसाठी सोबत जोडलेल्या परिशिष्टानुसार धोरण करणेचे विषयास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक -३०४** **विषय क्रमांक – ३०४**

**दिनांक- २९/०३/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३०४ दिनांक - २९/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.कक्षेका/जनि/३७/२०२३ दि.२०/०३/२०२३ आणि मा.स्थायी समिती ठराव क्र.१४४७ दिनांक २१/०३/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे 'क' प्रभागातील जलनि:सारण नलिकांची वार्षिक ठेकेदारी पद्धतीने साफसफाई करणे व चोकअप काढणे या कामांस मुदतवाढ मिळणेबाबत. |
| **ठराव क्र.३०४ दिनांक - २९/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.कक्षेका/जनि/३७/२०२३ दि.२०/०३/२०२३ आणि मा.स्थायी समिती ठराव क्र.१४४७ दिनांक २१/०३/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे 'क' प्रभागातील जलनि:सारण नलिकांची वार्षिक ठेकेदारी पद्धतीने साफसफाई करणे व चोकअप काढणे या कामांस मुदतवाढ मिळणेकामी ठेकेदार मे.आर्यन पंप्स ऍन्ड एन्व्हायरो सोल्युशन प्रा. लि. हे करीत आहेत. सदर कामाचे निविदा अटी शर्ती (A) मधील अट क्र. १७ नुसार सदर निविदेचा कालावधी ५ वर्षांचा असुन सुरुवातीस कामाचा आदेश १ वर्षासाठी द्यावयाचा आहे. त्यानंतर कामाची प्रगती, Performance विचारात घेवून पुढील प्रत्येक वर्षासाठी मा. स्थायी समितीच्या मान्यतेने मुदत वाढ देणेत येईल असे अटी व शर्तीमध्ये नमुद करणेत आलेले आहे. मनपाच्या 'क' प्रभागातील कामाची ०१ वर्ष कालावधीची मुदत दि. २८/०२/२०२३ रोजी संपत आहे. सदरचे काम नागरीकांच्या आरोग्याशी निगडीत असल्याने अखंडीत सुरु ठेवणे आवश्यक आहे. तसेच सदरचे काम अत्यावश्यक सेवेचे असल्याने मनपा मार्फत अखंडीत सुरु ठेवणे गरजेचे आहे. तरी सदर कामास सन २०२२-२०२३ च्या जुन्या दराप्रमाणेच १ वर्षासाठी मुदतवाढ घेणे आवश्यक आहे. त्या कामांची माहिती खालील तक्त्यात नमुद केलेली आहे. |

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम व निविदा दर | ठेकेदाराचे नाव | कामाचा आदेश, दिनांक व मुदत | स्थायी समिती मान्यतेकामी रक्कम रुपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे क प्रभागातील जलनि:सारण नलिकांची वार्षिक ठेकेदारी पद्धतीने साफसफाई करणे व चोकअप काढणे.(यांत्रिकी पद्धतीने) (निविदाक्र. 04/01/2021-22) | र.रू. १,१५,०९,४८०/- दर – २४.९०% कमी | मे. आर्यन पंप्स ऍन्ड एन्व्हायरो सोल्युशन प्रा. लि. | प्रथम- जनि/०२/कावि/२६१/२०२२, दि.१९/०४/२०२२ | र.रू. १,१५,०९,४८०/- | |

निविदा अटी व शर्ती(A) क्र. १७ नुसार मा.स्थायी समितीने ठरावात नमूद केलेला १ वर्षे कालावधीची मुदत दिनांक २८/०२/२०२३ रोजी पुर्ण होत आहे. वर नमूद केलेनुसार ठेकेदार मे.आर्यन पंप्स अँण्ड इनव्हायरो सोल्यू. प्रा.लि. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे 'क' प्रभागातील जलनि:सारण नलिकांची वार्षिक ठेकेदारी पद्धतीने साफसफाई करणे व चोकअप काढणे (यांत्रिकी पद्धतीने). या कामांस दिनांक – २८/०२/२०२३ पासून दिनांक – २८/०२/२०२४ पर्यंत प्रथम वर्षासाठीची मुदतवाढ व र.रु.१,१५,०९,४८०/- च्या खर्चास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| | |
|---|---|
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-३०५** **विषय क्रमांक – ३०५**

**दिनांक- २९/०३/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३०५ दिनांक - २९/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.वृक्ष/४/कावि/७९/२०२३ दि.२०/०२/२०२३ आणि मा.स्थायी समिती ठराव क्र. १३२३ दि. ८/३/२०२३ अन्वये, मनपाचे वृक्षसंवर्धन विभागाचे सन २०२२-२३ चे सुधारीत व सन २०२३-२४ चे मुळ अंदाजपत्रक मंजुरीबाबत. |
| **ठराव क्र.३०५ दिनांक - २९/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.वृक्ष/४/कावि/७९/२०२३ दि.२०/०२/२०२३ आणि मा.स्थायी समिती ठराव क्र. १३२३ दि. ८/३/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे जतन अधिनियम १९७५ प्रकरण ६ कलम १६ अन्वये मा.वृक्षप्राधिकरण समिती सभा ठराव क्र.१२ दि.११/०१/२०२३ चे सन २०२२-२३ चे सुधारीत व सन २०२३-२४ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता घेणे आवश्यक आहे. सबब सोबत प्रमाणे मा.वृक्षप्राधिकरणाने तयार केलेले व मंजुर केलेले अंदाजपत्रक असुन २०२२-२३ चे सुधारीत र.रू ४१,३०,७०,०००/- व सन २०२३-२४ चे मुळ अंदाजपत्रक र.रू.५५,३१,७०,०००/- इतके आहे. सदर अंदाजपत्रकास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-३०६** **विषय क्रमांक – ३०६**

**दिनांक- २९/०३/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३०६ दिनांक - २९/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.स्था/लेखा/१/कावि/१००८/२०२३ दि.२१/०३/२०२३ अन्वये, मनपाचे सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील विविध कामांसाठी एकत्रित प्रशासकीय मान्यता घेणेबाबत. |
| **ठराव क्र.३०६ दिनांक - २९/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.स्था/लेखा/१/कावि/१००८/२०२३ दि.२१/०३/२०२३ अन्वये मा. महापालिका (प्रशासक) सभा ठराव क्रमांक २८३ दिनांक १४/०३/२०२३ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सन २०२२-२३ चे सुधारीत व सन २०२३-२४ चे मुळ अंदाजपत्रक मा. स्थायी समिती ठराव क्रमांक १३२८ दि. १४/०३/२०२३ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ नुसार मान्यतेची शिफारस करून अंतिमत:स्विकृतीकामी मा. महापालिका सभेपुढे सादर केले होते. मा. महापालिका सभेचा कार्यकाल संपुष्ठात आलेने सदरचे अंदाजपत्रक मा. प्रशासक यांचेकडे सादर केले होते. त्यास प्रशासक महापालिका सभेने ठराव क्र. २८३ दिनांक १४/०३/२०२३ अन्वये मंजूरी दिलेली आहे. सदर अंदाजपत्रकात स्थापत्य, स्थापत्य उदयान, स्थापत्य क्रिडा, विद्युत, पाणीपुरवठा, जलनि:स्सारण, पर्यावरण व अन्य सर्व विभागांच्या भांडवली व महसूली कामांचा समावेश करण्यात आलेला आहे. मा. महापालिका सभेने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकातील वस्तू व सेवांचे खरेदी संदर्भातील महसूली कामे व भांडवली अंदाजपत्रकातील अत्यावश्यक सेवेतील कामे तसेच विकास कामे करण्यासाठी या आर्थिक वर्षातील सदरची भांडवली, महसुली, अत्यावश्यक सेवेतील कामे व विकास कामे यांच्या नावासमोर नमूद अंदाजपत्रकीय रक्कमेस एकत्रित प्रशासकीय मान्यता व सदर प्रशासकीय मान्यतेची रक्कम ही निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्यावर मंजूर निविदा रक्कमेइतकी राहील. तदनंतरच त्या/त्या कामांची निविदा प्रक्रीया हाती घेवून सदरची विकास कामे उपलब्ध कालावधी मध्ये करणे शक्य होईल. यासाठी प्रशासकिय मान्यता तातडीने मिळणे आवश्यक आहे.<br>सन २०२३-२४ या अर्थिक वर्षाचे मंजूर अंदाजपत्रकात नमूद केलेप्रमाणे अ अंदाजपत्रक सर्व विभाग, क अंदाजपत्रक, पाणीपुरवठा व जलनि:स्सारण विभाग, सर्व प्रकारच्या विशेष योजना, स्थापत्य उद्यान, स्थापत्य क्रिडा, पर्यावरण अभियांत्रिकी, झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभाग, झोनिपू स्थापत्य, EWS व BSUP विभाग, विद्युत विभाग, वृक्षसंवर्धन, शुध्द/अशुध्द जलउपसा केंद्र, सेक्टर २३, विद्युत, सर्व विभागाचे प अंदाजपत्रक कामे, भुयारी गटर योजना, सर्व प्रभाग, मुख्यालयासह प्रभाग स्तरावरील सर्व प्रकारची देखभाल व दुरूस्तीची कामे, UTF फंडातील विकास कामे इत्यादी सर्व विकास कामांच्या समोर दर्शविलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमेस तसेच महसुली अंदाजपत्रकातील वस्तु व सेवांच्या खरेदी संदर्भातील लेखाशिर्षासमोर दर्शविलेल्या एकूण अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणे आवश्यक आहे. सदर प्रशासकीय मान्यतेची रक्कम ही निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्यावर मंजूर निविदा रक्कमेइतकी राहील.<br>वरील प्रमाणे सदरचे विषयास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |

| | |
|---|---|
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**सही/-**
(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**